# जळगांव जिल्हयातील नद्या जोडणी प्रकल्प

पावसाळयात पडणारे पाणी वाहून जाऊ न देता त्या त्या परिसरातील नद्यांच्या माध्यमातून जोडणी करुन असे पाणी शेतीसह पिण्याच्या पाण्यासाठी वापरात यावे यासाठी केंद्र सरकारने नद्या जोडण्याचा निर्णय घेतला असून त्याची अद्याप अंमलबजावणी सुरु व्हावयाची आहे. मात्र जळगांव जिल्हयात जिल्हा प्रशासनाने नदी जोड प्रकल्प हा पायलट प्रकल्प म्हणून यशस्वी करुन दाखविलेला आहे. जळगांव जिल्हयात वर्ष २००५-०६ मध्ये सरासरी पेक्षा कमी म्हणजे फक्त ७३% पाऊस झाला होता. सन २००५-०६ चे पावसाळयात एकीकडे अतिवृष्टी, निसर्गाचा कोप तर दुसरीकडे राज्यात सर्वात कमी म्हणजे सरासरीच्या ७३% आणि सरासरी पेक्षा फार कमी पाऊस जळगांव जिल्हयात असे चित्र दिसले. अर्थातच हे प्रमाण देखील जिल्हाभर सारखे नसून कमी अधिक प्रमाणातच असल्याने खरिप हंगाम जाणार होता आणि पिण्याच्या पाण्याची टंचाई भेडसावणार होती असे चित्र स्पष्ट दिसत होते. अशा परिस्थितीत नाशिक जिल्हयात गिरणा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात यंदा मोठया प्रमाणात पाऊस झाल्यामुळे जुलै अखेर गिरणा धरण भरल्यानंतर वाहून वाया जाणारा अतिरिक्त पाणी बोरी, भोकरबारी, म्हसवा व इतर धरणात वळवून आणि ते बोरी, तितूर, अंजनी या नद्या नाल्यांना जोडून पूनर्भरण करण्याच्या कार्यवाही बाबत नियोजन करण्यात आले. जळगांव जिल्हयात ज्या नद्या नाल्याना पूर डोळयांना दिसले नाही त्या जिल्हयांत नदी जोड प्रकल्पामुळे उपलब्ध होणा-या पाण्याने ७०० मध्यम, लघु प्रकल्प व K.T.Weirs,बंधारे व पाझर तलाव, गांव तलावांचे पूर्नभरण करण्याबरोबरच १६ हजारांहून अधिक विहिरी रिचार्ज झाले. पाऊस तर सर्वात कमी झाला परंतु नद्या, नाले, तलाव मोठया प्रमाणावर भरले. यावरुन जळगांव जिल्हयातील नद्या जोड प्रकल्पाची यशस्वीता स्पष्ट दिसते. जळगांवत या प्रकल्पाचा मोठा लाभ झाला असल्याने हा प्रकल्प जिल्हयात, विभागात, राज्यातच नव्हे तर देशात नावरुपास येण्यास यशस्वी ठरला.

गिरणा धरण क्षेत्रातील नदीजोड प्रकल्प यशस्वी करण्यासाठी चार कालव्यांच्या वापर केला त्यात आवश्यक ती दुरुस्ती केली, वहन क्षमता वाढविली तसेच ज्या ठिकाणी गरज भासली या ठिकाणी अतिरिक्त काम करुन नवीन कालवा, नाले ही तयार केले व या कामासाठी टंचाई निधीतून २ कोटीचा निधी शासनाकडून प्राप्त करुन घेतला. जिल्हयास या २ कोटी निधीमुळे संभाव्य टंचाई सदृश परिस्थितीस सामोरे जातांना टँकरसाठी लागणारे सुमारे किमान ९ कोटी रुपयांची बचत झाली. गिरणा प्रकल्प तर २००५ या वर्षात जुलै मध्ये पूर्ण क्षमतेने भरला. केवळ

भरलाच नव्हे तर वारंवार पाणीही ओसंडले. ओसंडणारे व सोडले जाणारे पाणी वाहूनच वाया जाऊ न देता नदी जोड प्रकल्पाद्वारे त्या पाण्याचा पूर्ण उपयोग धरण के.टी.वेअर,तलाव, बांध,तळी व विहिरीचे पूर्नभरण करण्याच्या निर्णयाची प्रत्यक्षपणे अंमलबजावणी केली गेली.

जळगांव जिल्हा प्रशासनाने जलसंधारणाच्या विविधांगी उपक्रमाबरोबरच जलपुर्नभरण प्रकल्पातील पुढील पाऊल म्हणून नदी जोड प्रकल्पाला प्राधान्य दिले. हा प्रकल्प राबविण्याच्या संकल्प जिल्हाधिकारी विजय सिंघल यांनी प्रत्यक्षपणे हाताळण्याचा प्रयत्न जिल्हाधिकारी पदाची धूरा सांभाळताच मुर्त स्वरुपात आणला, पांझण डावा,जामदा डावा,जामदा उजवा, निम्न गिरणा कालवाच्या माध्यमांतून बोरी, म्हसवा, भोकरीबारी यासह ७०० लहान-मोठे प्रकल्पात पुर्नभरण केल्याने १६ हजाराहून अधिक विहिरी रिचार्ज झाल्यात. एकूण ४४८६ द.ल.घ.फु. पाण्याची प्रत्यक्ष साठवण केली या पाण्याची किंमत जर काढली तर ते ११ कोटीचे वर जाते.

गिरणा धरण नाशिक जिल्हयातील चांगल्या पर्जन्यमानामुळे अनेकदा ओसांडले गेल्यावर्षी ही गिरणा धरण १०० टक्के भरल्यानंतर पाणी मोठया प्रमाणात वाहून वाया गेला पण अशा रितीने पाण्याचा वापर कधी केला गेला नाही. हा नदीजोड प्रकल्पाचा विचार सुचला तर जिल्हा प्रशासनाला ! गिरणा धरणातील पाणी नदीपात्रात सोडण्या बरोबरच कालव्यामार्फत गिरणा लाभ क्षेत्रातील बोरी, अंजनी व तितूर या नदयात सोडण्याचा अभिनव उपक्रम जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली जळगांव पाटबंधारे विभागाने राबवून हा पहिला पायलट प्रकल्प यशस्वी ठरविण्यात सहकार्य केले. बोरी धरण गिरणा धरणातील पाण्याच्या माध्यमातून भरले गेल्याने पारोळा गावास यापूर्वी आठवडयातून एकदा होणारा पाणी पुरवठा दर दिवशी दिला गेला. पारोळा, एंरडोल, धरणगांव, चाळीसगांव, भडगांव अमळनेर, पाचोरा या सततच्या दुष्काळग्रस्त ठरणा-या तालुक्यांना नदीजोड उपक्रमाचा फायदा फक्त पिण्यासाठी नव्हे तर सिंचनानासाठी सुध्दा मोठया प्रमाणावर झालेला आहे. तसेच पारोळा,एंरडोल, धरणगांव, जळगांव,पाचोरा या पाच नगरपालिकासह १२८ गावांतील सुमारे ८,२३,००० जनतेचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यास या नदीजोड प्रकल्पामुळे मदत झाली आहे.या प्रकल्पामुळे हजारो हेक्टर शेत जमिन सिंचनाखाली आलेली आहे.

**<u>पहिला मार्ग :</u>** गिरणा धरणाचे पुराचे वाहून जाणारे पाणी पांझण डाव्या कालव्या मार्गे बोरी धरणात सोडण्यांत आले.गिरणा प्रकल्पाच्या पांझण डाव्या कालव्यांच्या कि.मी. ४१ मधून मोरदड खोरदड कालव्याच्या २ कि.मी. वरील स्थानिक नाल्यामार्गे ८ कि.मी. व नंतर बोरी नदीमार्गे धरणा पर्यत १५ कि.मी. असे एकूण ७० कि.मी. वहन करुन पाणी सोडण्यात आले. नंतर पांझण डाव्या

कालव्याच्या कि.मी.३१ मध्ये कालव्याद्वारे Divert करुन त्यानंतर स्थानिक नाल्या १५ कि.मी. व नंतर कन्होली नदी ते बोरी २.५ कि.मी. व नंतर बोरी नदीद्वारे धरणा पर्यत १९.५० कि.मी. वहन असे एकूण ६८ कि.मी. वहन करुन पाणी देण्यात आले. अशा रितीने बोरी धरणात एकूण ९३७ द.ल.घ.फु. साठा (७०%) गिरणा धरणातील पाण्यामध्ये नदी जोड प्रकल्पा द्वारे करण्यात आला.या साठयातून  बोरी प्रकल्पावर अवलंबून असणा-या पारोळा नगरपालिका तसेच इतर ५ मोठया पाणी पुरवठा योजनेद्वारा ४३ गांवाना पाणी पुरवठा करण्यात आल्याने त्या गांवातील लोकसंख्येला पाणी टंचाईचे तीव्र संकटावर मात करण्यास मदत झाली आहे. तसेच गतवर्षी पारोळा तालुक्यातील सर्व तालाव सुकल्यामुळे टॅकरने पाणीपुरवठा करावा लागत असल्याने त्यांनाही आता या प्रकल्पाच्या कार्यवाहीमुळे टॅकरसह पिण्याचा पाण्याचा प्रश्न मोठया प्रमाणात सुटण्यास मदत झाली आहे.

**दुसरा मार्ग :** गिरणा धरणातून गिरणा नदी,जामदा बंधारा,जामदा डावा कालवा, तेथून पुढे पारोळा शाखा कालव्यातून नाल्याद्वारे म्हसवे लघु पाटबंधारे तलावात,तेथून भोकरबारी मध्यम प्रकल्पात पाणी सोडण्यात आले. या १३२ कि.मी. अंतराच्या पाण्याच्या प्रवासामुळे  भोकरबारी प्रकल्प सुध्दा समृध्द झाला आहे.

**तिसरा मार्ग :** गिरणा धरणातून गिरणा नदी,जामदा बंधारा,जामदा डावा कालवा,तथून पारोळा शाखा कालवा मार्गे नाल्याद्वारे अंजनी नदीत व अंजनी नदीद्वारे काळया बांधा-यात हे पाणी १२७ किमी. अंतर कापून पोहचले आहे.

**चौथा मार्ग :** गिरणा धरणातून गिरणा नदी,जामदा बंधारा,जामदा उजवा कालवा, कालव्यातून नाल्याद्वारे तितूर नदीला जोड,तितूर नदीतून होळ बंधारा, बाळद बंधारा,वडगांव बंधारा आणि परत तितूर नदी. असे ८४ कि.मी. अंतर या टप्पयात गाठले गेले.

**पाचव्या मार्ग :** गिरणा धरणातून गिरणा नदी, जामदा धरण, पुन्हा गिरणा नदी, पुढे दहीगांव बंधा-यात, तेथून निम्न गिरणा डावा कालवा, पुढे नाल्याच्या माध्यमातून हे पाणी अंजनी नदीला जोडण्यात आले व या पाण्याचा साठा शेवटी पिंप्री  बंधा-यात करण्यात आला. या शेवटच्या टप्प्यात पाण्याचा प्रवास १८६ कि.मी.झाला आहे. आणि पाच मार्गाव्दारे नदी जोड प्रकल्पामुळे गिरणा नदी वर पाझण डावा कालवा, जामदा बंधारा व जामदांबधा-या वरील जामदा डावा कालवा व जामदा उजवा कालवा तसेच दहिगांव बंधारा व निम्न गिरणा कालवा या कालव्या द्वारे सतत पाणी वळविण्यात येवून लाभक्षेत्रातील  २ मध्यम प्रकल्प, ५ लघु प्रकल्प, २२ पांझर तलाव, २५ कोल्हापूर बंधारे व इतर असे एकूण ७०० प्रकल्प भरले आणि व १६,०६८ विहिरीचा पूर्नभरण करण्यात आला. अतिरिक्त पाण्यातून ४,४८६ द.ल.घ.फु. पाण्याचा उपरोक्त पध्दतीने

नदी, कालवे, नाले व तलाव यांच्या माध्यमातून साठवण करण्यांत आला. लाभक्षेत्रातील विहिरीची पाणी पातळी वाढवून टंचाई वर मात करणे शक्य झालेले आहे. तसेच सिंचनास त्यामुळे मोठया प्रमाणावर फायदा होत आहे.

या नदी जोड प्रकल्पामुळे पाऊस कमी असून सुध्दा पाणी पातळीत वाढ झालेली आहे म्हणजे पाण्याची पातळी वर आलेली आहे असे भूजल सर्वेक्षण शासकीय यंत्रणा (GSDA) यांनी प्रसिध्द केलेल्या अहवालावरुन स्पष्ट दिसते. चाळीसगांव, भडगांव, पाचोरा, धरणगांव, एंरडोल, अमळनेर या ठिकाणी या प्रकल्पामुळे पाणी पातळी वर गेलेली असल्यामुळे पिण्यासह सिंचनासाठी सुध्दा पाणी उपलब्ध झालेला आहे. काही ठिकाणी तर सरासरी पेक्षा ४५ % कमी पाऊस असून सुध्दा पाण्याची पातळीत वाढ झालेली आहे. यावरच या प्रकल्पाची यशस्वीता स्पष्ट दिसून येत आहे. **सदर नदी जोड प्रकल्पामुळे सन २००५-०६ मध्ये जळगांव जिल्हयाचे इतिहासात सर्वात जास्त सिंचन झालेला आहे. म्हणजे ३०% सरासरीपेक्षा कमी पाऊस असूनही ३५ % जास्त क्षेत्रफळ सिंचनाखाली आलेला आहे.** सदर नदी जोड प्रकल्पामुळे कालव्याची दुरुस्तीसूध्दा कायमस्वरुपी झालेली आहे, त्यामुळे seepage व इतर losses कमी होऊन कालव्याची वहन क्षमता व सिंचन क्षमतासूध्दा वाढलेली आहे. या प्रकल्पामुळे लोकांना रोजगार सूध्दा मिळालेला असून रोजगार हमी योजनेच्या कामावर निधीची बचत सूध्दा झालेली आहे.

**मा.ना.मुख्यमंत्री यांनी सदर नदी जोड प्रकल्पाची स्तुती केलेली असून सदर कार्यक्रम प्रत्येक जिल्हयात राबविणे आवश्यक असून मराठवाडयात तर तात्काळ राबविण्याचे आदेश ही प्रशासनाला दिले.** *त्यावेळी मा.ना.श्री.आर.आर.पाटील, उपमुख्यमंत्री, मा.ना.श्रीमती सुर्यकांता पाटील, केंद्रीय ग्रामविकास राज्यमंत्री, मा.ना.श्री.अशोक चव्हाण उद्योग मंत्री, मा.ना.श्रीमती.विमलताई मुंदडा, सार्वजनिक आरोग्य मंत्री, मा.ना.श्री.जयप्रकाश दांडेगावकर, सहकार राज्यमंत्री, यांनी सुध्दा सदर कार्यक्रमाची प्रशंसा केली.*

**जळगांव येथे भारत कृषक समाजाचे राष्ट्रीय अधिवेशनाचे वेळी सदर प्रकल्पाबाबत संपुर्ण माहिती व प्रेझेंटेशन जेव्हा मा. ना. श्री शरद पवार, केंद्रीय कृषी मंत्री व मा. श्री बलराम जाखड, राज्यपाल, मध्यप्रदेश व मा. श्रीमती प्रतिभाताई पाटील, राज्यपाल, राज्यस्थान यांना देण्यात आली तेव्हा त्यांनी सुध्दा हा प्रकल्प अत्यंत चांगला असुन पुर्नभरणाची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त करुन, प्रकल्पाचे कौतुक केले व असे प्रकल्प सर्व ठिकाणी राबविले जावे अशी इच्छा ही व्यक्त केली.**

**मा.ना.श्री.अजितदादा पवार,जलसंपदा मंत्री, यांनी नदीजोड प्रकल्पाद्वारे पाण्याच्या पूर्नरभरण करुन बोरी धरणात जलपूजन केले आणि सदर कार्यक्रमा बद्दल कौतुक ही केले आणि सदर नदीजोड कार्यक्रम प्रत्येक जिल्हयात राबविला जावा त्यासाठी राज्यस्तरावरुन परिपत्रकही निर्गमित केले.**

**या नदी जोड प्रकल्पाची यशस्वीतः व फायदे पाहून मला ऑस्ट्रेलियन सरकारने BRISBANE, AUSTRALIA येथे आयोजित केलेल्या *9th INTERNATIONAL RIVER SYMPOSIUM 2006* साठी *BRISBANE, AUSTRALIA* येथे या कामाचे सादरीकरण करण्यासाठी बोलाविले होते आणि यासाठी सर्व खर्च ऑस्ट्रेलिया सरकार यांनी केला होता.** ऑस्ट्रेलिया येथे या आंतरराष्ट्रीय फोरममध्ये १ ते १० सप्टेंबरच्या दरम्यान मी जळगांव जिल्हयात राबविण्यात आलेल्या नदी जोड प्रकल्पाचे सादरीकरण केले. त्या ठिकाणी केलेल्या कामाची सर्वांनी स्तुति आणि प्रशंसा केली. हया **INTERNATIONAL SYMPOSIUM** मध्ये ५० देशांचे ५५० प्रतिनिधी उपस्थित होते.

**राज्य शासनाने हया प्रकल्पाची संपूर्णतः तपासणी व छाननी करुन व त्यानंतर मान्य करुन केंद्र शासनाला सदर प्रकल्प *"PRIME MINISTER'S AWARD FOR EXCELLENCE IN ADMINISTRATION."* यासाठी पाठविण्यात आले आहे.**

सदर नदीजोड प्रकल्पाचे सादरीकरण करण्यासाठी मला राजस्थान सरकारने जयपूर येथे बोलाविले होते. मी जयपूर येथे "A CONCLAVE ON GOOD GOVERNANCE" या कार्यक्रमात मा.मुख्यमंत्री श्रीमती वसुंधरा राजे त्यांचे सर्व मंत्री, राज्यमंत्री, मा.मुख्य सचिव, अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, सर्व आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी यांचे उपस्थितीत सदर नदीजोड प्रकल्पाचे सादरीकरण केले. मा.मुख्यमंत्री श्रीमती वसुंधरा राजे शिंधीया तसेच इतर सर्वांनी जळगांव येथे केलेल्या नदीजोड प्रकल्पाचे कामाची प्रशंसा केली. तसेच सदर नदीजोड प्रकल्प राजस्थान येथे इतर जिल्हयातसूध्दा राबविण्याच्या सूचना सूध्दा त्यांनी सदर बैठकीत दिल्यात.

देशाचे स्तरावर नदी जोड प्रकल्प जेव्हा होईल तर तेव्हा होईल पण या रितीने जळगांव जिल्हयात लहान स्तरावर Model म्हणून केलेला नदीजोड प्रकल्प जर इतर जिल्हयात, राज्यात राबविला गेला तर निश्चितच याचा फायदा होईल असे वाटते.